# सुनीतावलि



861·6

861·6
Adhi
5226

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00904

श्रीशिवजयंति

शके १८४६.

904

# सुनीतावलि

लेखक,

गोपाळ गोविंद अधिकारी.

प्रकाशकः—
दि. सि. वैद्य
चिटणीस ' काव्यप्रसारकमंडळ ' ठाणें.

M12590

मुद्रकः—
लक्ष्मण भाऊराव कोकाटे,
"हनुमान" प्रेस, घ. नं. ३००
सदाशिव, पेठ पुणें.

# प्रस्तावना

" The stirring of the poetic impulse is very markedly at work among us at present, and there is no more remarkable sign of the times than the steadily growing public appreciation of the sonnet as a poetic vehicle "

–W. Sharp.

आज शिवजयंति आहे. स्वधर्मसंरक्षणार्थ श्री छत्रपति शिवाजी महाराजांनीं आज महाराष्ट्राच्या रंगभूमीवर अवतार धारण केला. स्वराज्यसंस्थापनेशिवाय स्वधर्माला आसरा मिळणें अशक्य होतें, म्हणून बंड करण्यापासून त्यांच्या चरित्राला प्रारंभ होणें अनिवार्य झालें. उत्तरोत्तर बंडखोराची यशस्विता ' छत्रपति ' पद धारण करती झाली, हें पर्यवसान जगद्विख्यात आहेच.

कवींचा धर्म म्हणजे स्वातंत्र्यच होय. स्वातंत्र्याला–उत्तरोत्तर उत्कर्षावस्थेस नेणाऱ्या स्वातंत्र्याला आळा पडूं लागला तर तो कोणा स्वाभिमान्याला सहन होईल ?

सांप्रतच्या वाङ्मयचर्चेकडे पाहिलें तर आमच्या सभोंवारची परिस्थिति कशी आहे ती सहज कळून येते. अशा परिस्थितींत ' सुनीतावलि ' प्रसिद्ध करतांना आमच्यावर काय जबाबदारी पडत आहे ती लक्षांत घेतली म्हणजे वरील सवाल विचारून, पुढील चार ओळी लिहिणें जरूर वाटतें.

संसर्गानें दळणवळण सुरू होतें हा व्यवहारकोषांतील नियमच आहे. इंग्लिश वाङ्मयाशीं आमचा अधिकाधिक निकट संबंध येऊं लागल्यापासून पुष्कळ इंग्लिश काव्यप्रकार आमच्याकडे रुपांतरित होऊं लागले; आणि त्यांच्या प्रादुर्भावाबरोबर नाक मुरडणारे उपहासकही प्रथमारंभीं अवतीर्ण होऊं लागले. हा इतिहास कोणत्या वाङ्मयांत सांपडणार नाहीं ? एकाद्या ध्येयाचे पुरस्कर्ते पुढें आले कीं, त्यांना अवरोध करणारे निंदकही पुढें सरसावतात हा समाजाच्या मनोरचनेचा ठळक गुण आमच्याप्रमाणें जगाच्या वाङ्मयामध्येंही सारखाच आहे. एकानें एक चांगलें आणि स्वीकारार्ह म्हणावें आणि दुसऱ्यानें तें वाईट अतएव त्याज्य म्हणून

ठरवावें, हें वादाचें ठोकळ स्वरूप अनादिकालापासून चालत आल्याचें दिसत आहे. पुरस्कारकर्त्यांनीं त्याची उपयुक्तता परिश्रमपूर्वक सप्रमाण निदर्शनास आणून देऊन कितीही कंठरवानें सिद्ध केली तरी प्रतिकारकर्त्यांची सदसद्विवेकबुद्धि इतकी अंधळी असते आणि तिला आपल्या अंधळेपणाचा इतका दुरभिमान असतो, कीं ती युक्तिवादकांच्या शब्दांकडे बधिरकर्ण राहूनच, आपल्या निंदेची टिमकी जोरजोरानें वाजविण्यांत सार्थकता मानीत असते. परंतु अशा वेळीं काळच न्यायाधीश ठरून युक्तायुक्ततेचा निवाडा देतो; किंबहुना काळच अशा निंदकांचा सूड घेतो.

मराठींत सुनीत दृढमूल होतांना अशींच रणें माजणार आणि आजही माजूं लागलीं आहेत. मराठी वाङ्मयाच्या संक्रमणकालापासून आजमितीपर्यंतचा इतिहास पाहिला तर, सुनीताचें जें बीजारोपण झालें तें निष्फळ न होतां, त्याचा अंकुर जागच्याजागीं करपून न जातां, श्रीसमर्थांच्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं, ही सुनीत–वल्ली " काव्यमंडपीं वेला गेली " असल्याचें आज स्पष्ट दिसत आहे. थोडयाबहुत दिव्यांतून सुनीत आज पारही पडलें आहे. आणि अनेक संकटांत शिरसलामत निभावलेल्या धीरवीर पुरुषाच्या कृतींत ज्याप्रमाणें तपस्येचें सामर्थ्य येतें, वाणींत आत्मविश्वास खणखणूं लागतो, आणि तोंडावर तेज खेळूं लागतें, त्याप्रमाणेंच आज मराठी सुनीताच्या पुण्याईचा कोटही इतका बळकट झाला आहे कीं, आणखी कांहीं हल्ले आले तरी तो डगमणार नाहीं.

सुनीताचा साद्यंत इतिहास देण्याचें हें स्थान नव्हे. आमच्या पूर्वींच्या पिढींतील कवींनीं सुनीताची आयात नमुन्यादाखल थोडीशी केली आहे. तथापि आमच्या समकालीन कवींनीं सुनीताच्या निर्मितीला जोरानें हात घातलेला दिसतो. ज्ञानप्रकाशाच्या काव्यशास्त्रविनोदांतून या सुनीत काव्यप्रकाराला शास्त्रीय चालना दिली; आणि सरस्वतीच्या मांडीवर सुनीताची सतार कशी बसविली असतां स्वाभाविक व सुशोभित दिसेल हें रविकिरणमंडळाच्या " काव्यविचार " पुस्तकांत पुष्कळ ऊहापोह करून दाखविलें आहे. आमच्या माहितीप्रमाणें मराठी भाषेत तरी " सुनीता " वर इतका शास्त्रीय दृष्टया लिहिलेला हाच पहिला लेख होय! कोणतीही घटना प्रयोगावस्थेंत असतांना तिचें सर्वमान्य आणि सर्वसामान्य स्वरूप निश्चित होत नाहीं. त्याला कांहीं काळ जावा लागतो. चिरकालिक

स्वरूपाचें निश्चितफल हातीं येण्यापूर्वी विविधप्रकार करून पाहणें जरूर असतें. या दृष्टीनें " काव्यविचार " पुस्तकांतील प्रस्तुत लेखाचें महत्त्व विशेष असून, त्यावरून मराठींतील सुनीताला कोणतें रंगरूप खुलून दिसेल याची रूपरेखा सुश्लिष्ट झाली आहे.

तथापि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, पुष्कळ बहुश्रुत वाचकांना, सुनीत म्हणजे एक फुटकळ कविता, यापलीकडे कल्पना नाहीं. पाश्चात्य कवींप्रमाणें इकडच्या कवींनीं सुनीताचा अंगिकार केला त्याबरोबरच पाश्चात्य काव्यटीकाकाराप्रमाणें इकडच्याही टीकाकारांनीं सुनीताबद्दल अनुदार उद्गार असहिष्णुतेनें—संकोचित मनोवृत्तीनें काढले आहेत. मासिकांतील मोकळी जागा भरून काढण्यापलीकडे अशा कवितांचा दुसरा उपयोग नाहीं, अशा प्रकारचे कुत्सित उद्गार कानावर येतात. चौदा ओळी एवढेंच बंधन ज्यांत पाळलें आहे अशी एक कविता, असा सुनीतासंबंधींचा ग्रह पूर्वीच्या पिढींतील कांहीं कवींचा आणि सरोस जुन्या नव्या रसिक वाचकांचा झाला आहे. उलटपक्षीं ज्यांनीं सुनीताच्या सबाह्यांतर शास्त्राची माहिती इंग्लिश वाङ्मयापासून करून घेतली आहे ते सुनीताच्या कडक निर्बंधाबद्दल कुरकुर करतांना आढळतात. परंतु ही कुरकुर केवळ निराधार आणि कल्पित आहे. होकायंत्राच्या मार्गदर्शकतेनुसार वागणें खलाशाला जितक्या प्रमाणांत बंधनकारक वाटत असेल, गुंतागुंतीच्या यंत्रसमुदायांत एंजिनड्रायव्हरला यंत्रांची हलवाहलवी करणें जितक्या मानानें बंधनकारक वाटत असेल, सेनानायकाच्या हुकूमतीखालीं डावीकडे किंवा उजवीकडे घोडा फेंकणें घोडेस्वाराला जितकें बंधनकारक वाटत असेल; तितक्याच सक्तीनें–जर याला सक्तीच म्हणायचें असेल तर–कवीलाही सुनीताच्या नियमांची मर्यादा पाळावयाची असते. सुनीताच्या शास्त्रीय बंधनांबद्दल तक्रार करणाऱ्यांच्या लक्षांत असें येत नाहीं कीं, सुनीताप्रमाणें प्रत्येक काव्यप्रकाराला आपापल्या परीनें बंधनें हीं असतातच. कोणतीही घटना बंधनावांचून नाहीं. खुरटी झोंपडी बांधण्यापासून तों राजवाडा उभविण्यापर्यंत सर्व प्रकारच्या शिल्पकलेला नियमांची जरूरी आहेच; आणि कलेच्या शाश्वतीसाठीं असलीं बंधनें अत्यवश्यक असतात. बंधनवैशिष्ट्यानें सुनीतालाही काव्यवाङ्मयांत स्वतंत्र स्थान प्राप्त झालें आहे. केवळ चतुर्दशपदी एवढेंच वरकरणी स्वरूप समजून त्याची हेटाळणी करणें हें अतज्ज्ञतेचें लक्षण होय.

कै. म. म. द. वा. पोतदार,

सुनीताचा मराठींत शिरकाव होऊं नये एतदर्थ खटपट, प्रतिकार आणि उपहास करणारांचे मुख्य तीन मुद्दे असे आहेत कीं [ १ ] सुनीत हें केवळ परकीय अनुकरण आहे, [ २ ] मराठी काव्यरचनेला अर्धश्लोकी रचना संमत नाहीं आणि [ ३ ] अनेक नांवा–उप–नांवांचे शेंकडों काव्यप्रकार मराठींत असतांना याचीच काय जरुरी आहे ?

हे तीन मुद्दे म्हणजे महत्वाकांक्षी तरण्याबांड मुलाला वयोवृद्ध–अस्थिपंजर-शेष वडिलाचा उत्साहभंग करणारा उपदेशच होय ! या तीन मुद्यांचा निरास अगदीं सहजासहजीं करतां येण्यासारखा आहे. सुनीत हें परकीय अनुकरण आहे, हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं आणि कबूल करण्यांत कमीपणा नाहीं. परदेशांत उगवणारीं फळझाडें आणि फुलझाडें आपल्या बगीचांत लावून सौंदर्यांत भर घालणें आजपर्यंत कोणाला लज्जास्पद वाटलें नाहीं; उलट सुसंस्कृत अभिरुचीचें आणि उद्योगशीलतेचें हें लक्षण समजलें जातें. परकीय मालाशीं चढाओढ करण्यांत व्यापाऱ्यांची महत्वाकांक्षा गढून गेली तर तिला उत्तेजन देण्यांत येतें. जें आपल्यांत नाहीं आणि स्वीकारणीय आहे तें परकीयापासून शिकण्यांत आणि त्याचा अनुकार करण्यांत कोणता कमीपणा आहे तें कळत नाहीं. परकीयांचें फायदेशीर वैशिष्ठ्य आत्मसात करून, त्यावर स्वत्वाचा शिक्का मारण्यानें आपली राष्ट्रीय संपत्ति वृद्धिंगत केल्याचें श्रेय येईल. राष्ट्रीय संपत्तींत वाङ्मयाचा समावेश होत नाहीं का ?

" अर्धश्लोकी रचना मराठीला संमत नाहीं " हा दुराग्रही मुद्दा धरून बसण्यांतही विशेष हांशील नाहीं. अनभ्यस्तपणामुळें या नवाईला वाचक प्रथम बिचकेल खरा; पण औटकी पाहिल्याबरोबर " अब्रह्मण्यम् ! अब्रह्मण्यम् ! " अशी आरोळी ठोकण्याइतकी त्यांत अनीति नाहीं खास ! उलट अर्थ संपला तरी, निरर्थक शब्दांचा भरणा करून, श्लोकपूर्ती करून नीरसतेचें अगर चर्वितचर्वणाचें माप पदरांत घेण्यापेक्षां अर्धश्लोकी रचना अधिक हितावहच आहे.

मराठींत अनेक वृत्तप्रकार व अनेक अर्थालंकार आहेत म्हणून नवीनाला मज्जाव करायला हे प्रतिकारकर्ते इच्छितात. पण या प्रकाराच्या भरतीनें श्री-शारदेच्या अंगणांत खेचाखेच होईल इतकें तें कांहीं अरुंद नाहीं. शार्दूलविक्रीडित वृत्त असतांना विबुधप्रिया कशाला, अगर अम्लानपंकजमाला असल्यावर

गोमूत्रिकाबंधाची काय जरूरी, असले प्रश्न विचारणें जितकें मूर्खपणाचें होईल, तितकेंच सुनीताला आडकाठी घालणें मूर्खपणाचें होईल.

' प्रयोजन ' विचारणारे केवळ उपरोक्त हेतूनेंच विचारीत असले तरी, या प्रश्नाला दुसरें शास्त्रीय आणि खरेंखुरें एकच अत्यंत महत्वाचें कारण आहे. Best modern form for the expression of an isolated emotion, thought or idea असें सर्टिफिकेट सुनीताला सर्व पाश्चात्य भाषांकडून एकमतानें मिळालें आहे. सुनीताचें थोडक्यांत आणि सर्वमान्य लक्षण असें आहे कीं—

A sounet is a wave of melody:
From heaving wat‹rs of the impassioned soul
A billow of tidal music one and whole
Flows in the octave, then returning free,
Its ebbing surges in the sestet roll
Back to the deeps of Life's tumultous sea,

सुनीताच्या पूर्वार्धांत क्षुब्द अंत:करणाच्या हेलावलेल्या स्थितींतून उत्पन्न झालेल्या भावनेची, विचाराची आणि कल्पनेची चढती लाट असून, उत्तरार्धांत तिचाच अवरोह झाला पाहिजे.

सुनीताचे अगदीं ढोबळ मानानें जे दोन प्रकार पडतात त्यापैकीं मिल्टनच्या सुनीत धर्तीला जुळणारी अशी ही व्याख्या असली तरी शेक्स्पीयरच्या सुनीतधर्तीलाही ती लागू करतांना कांहीं प्रत्यवाय येणार नाहीं. कारण उत्पन्न झालेली लाट सावकाश जिरून जाईल अगर अकस्मात् ती खालीं आदळेल. तथापि विशेषच सुस्पष्ट रीतीनें शेक्स्पीयरच्या सुनीतांतील शेवटच्या पंक्तियुग्माचें वैशिष्ट्य व्यक्त करावयाचें म्हणजे असें कीं—

" A couplet coming not too far from the initial verse, so as to lose its binding power and yet not so near the initial verse that the ring of epigram disturbs the linked sweetness long drawn out of this movement, but sufficiently near to shed its

influence over the poem back to the initial verse."

उपमा देऊनच वरील अर्थ व्यक्त करावयाचा झाल्यास असें म्हणतां येईल कीं, फुलाला जसा देठ तसें वरच्या बारा ओळीला शेवटचें पंक्तियुग्म होय. देठ म्हणजे पाकळ्या नव्हे, पण पाकळ्यांचें एकीकरण होऊन पाकळ्यांना पुष्पत्वाप्रत पोंहोंचविणारा अवयव होय.

सारांश, सांगावयाचें होतें तें झालें. 'सुनीत' या नांवाला पुष्कळांचा आक्षेप आहे. परंतु त्याला कारण कांहींच नाहीं. 'सुनीत' हा शब्द आणि 'सुनीत' हा काव्यप्रकार आज बहुतेक कवींना स्वीकारार्ह वाटला असून, त्यांची अंतःप्रवृत्ति त्या दिशेनें वाहूं लागली आहे. एके काळीं सुनीताचा द्वेष करणारे कवि आज सुनीताला कुरवाळीत आहेत. ही सर्व वस्तुस्थिति पाहिली कीं "सुनीत" हा अलंकार महाराष्ट्र शारदेला खास पसंत पडणार आणि प्रस्तावनेच्या आरंभीं उध्दृत केलेल्या वाक्याचा पूर्वार्ध आजच प्रचीतीस आला असून उत्तरार्धही लवकरच प्रचीतीस येणार असा विश्वास वाटतो.

शिवजयंति १८४६. पुणें शहर.

यशवंत आणि श्रीयुत गो. गो. अधिकारी.



ब्लॉक व छपाई, मनोरंजन प्रेस, मुंबई.

*To*

*My Dear* **YESHWANT**

डॉ. भ. म. व बा. तोलवार,
ग्रंथ संग्रह

## रायगडावर काय आहे ?

### ( शार्दूलविक्रीडित. )

होते छत्रपती शिवप्रभु जिथें त्या राजधानीमधें
आनंदें डुलवील दृश्य असलें आहे अतां कोण तें-
सांगा वर्णुनियां अम्हांस सगळी तेथील सद्यःस्थिती
ऐसे प्रश्न विचारुनी मज किती भंडावुनी सोडिती.
सांगावें असलें न आज उरलें कांहींच तेथें जरी
सांगूं काय बरें तुम्हांस जन हो, हा प्रश्न ये अंतरीं !
नाहीं वाजत चौघडा न भगवा झेंडा तिथें आजला
जातीचा म्हणवील शूर न तिथें कोणी असा राहिला
ते प्रासाद विशाल आज न तिथें, भंगून गेले कडे,
तें येईल वर्णोनि मात्र तुमच्या अंधार डोळ्यांपुढें
झालें सर्व भयाण आणि हसतें दुर्दैव तेथें अतां !
कैंचा मोद परंतु हाय, उलटी वाटेल उद्विग्नता !

तत्रापी जर याल कां हृदय तें घेवोनिया संगतीं
पूर्वीचें सगळें तुम्हांस दिसुनी येईलही संप्रती.

ता. २०।१२।२३ पुणें.

शि. प्र. मंडळी, पुणें
कै. म. म. डॉ. द. वा. पोतदार
अभ्यासिका
दाखल अंक 5226
वर्गांक 86106/Adh
नत ............ तारीख 30/3/93.

## तो अस्पृश्य मला

### ( शार्दूलविक्रीडित )

बोलायास बसा जरा क्षणभरी भारूनिया टाकिल
गोष्टी सांगुनि चार, कष्ट मनिंचे सारे लया नेइल.
त्या ऐकोनि तुम्हां गमेल अगदीं हा कोण वाचस्पती,
नाहीं आजवरी असा बघितला कोणीं जगीं म्या कधीं !
भार्येवीण समस्त पूज्य ललना मातिप्रमाणें जया,
जो माघार कधीं न घेइल उडी देशार्थ टाकावया,
साह्यातें भररात्रिं येइल दिल्या बोलाप्रती जागुनी,
दीनांच्याकरतां मरेलहि पुढें प्रेमें स्वतां होउनी,
लोकांच्यामाधिं वर्णनीय असतें विद्वत्त्व ज्याचें तसें
तैशी साधिच वर्तणूक अगदीं लोकांत ज्याची असे.

त्याचें चित्त जळेल तें जर परोत्कर्षाप्रती पाहुनी
वेळावेळ न पाहतां करिल तो खोटी टवाळी जनीं—
तो कोणी असु द्या कितीहि गुणवान् वा सोवळा ब्राह्मण
तो अस्पृश्य मला, नको क्षणभरी त्यांचे कधीं दर्शन.

ता. ४।११।१९२२ महाड.

## वंचनेनंतर

### ( साकी )

गुलाब वहरे उद्यानांतिल कांटेरी रोप्यांत !
फुलें केतकी फणीधरांच्या भयकर रखवालीत !
प्रफुल्ल होतो शुभ्र मोगरा रजनीच्या भरतींत
दुःखाच्या गर्तेत खरोखर तशी नांदते प्रीत ! !
सुदैव म्हणुनी कसा धांवलों दुर्दैवाच्या पाठीं !
झुरणें आलें आतां नशिबीं नाजुक नवतीसाठीं !
सुख-सरिता जी मला भासली प्रथमदर्शनीं मूर्त
तिनेंच मजला आज लोटलें अखेर या विरहांत ।
नटव्या सुंदरतेस भाळुनी फसव्या बाजारांत
फसला माझा जीव खरोखर इष्काच्या ईर्षेत.
या जन्मीं दिनरात्र वाहुनी अतां फुलें अश्रूंचीं
प्रीतीखातर बांधा पूजा त्या सुंदर जीवाची ! ।

नसेलना ही प्रेमपरीक्षा अथवा या हृदयाची
एकाकीं ती करुणामूर्ती निर्दय ना व्हायाची !

ता. १०।११।२२ महाड.

# त्यावेळीं आणि आता

## ( वसंततिलका )

तूं आणखी खचित मीहि गडे ! लहान,
एकत्र बालपण कंठियलें रमून;
खेळांत तूं जुळविलीं कितियेक नातीं
होतीं; परि स्मरति काय गडे ! तुला तीं ?
केलेस तूं मज कधींकधिं कारकून,
मी चाललों तुजपुढें हुजऱ्या बनून,
तूं एकदां हंसत झालिस कोण माझी,
छे, कल्पनाहि मज आज नको तयाची !
जोडी मनोहर दिसे सगळ्या गुणानें
केलें किती ह्मणुनि कौतुक त्या जगानें !
माझें तुझें परि खरोखर काय नातें
ठाऊक गे तुज न वा मजला न होतें !

आतां तुला कळतसें जगिं कोण मीं हें.
आतां मला कळतसे जगिं कोण तूं हें.

ता. १५।८।१९२३. ठाणें.

# ताजमहाल आणि यमुना

## (शार्दूलविक्रीडित)

होतें मंदिरही स्मशानगृहसें प्रीतीमुळें दुःखद
होतें मंदिरसें स्मशानगृहही प्रीतीमुळें सौख्यद,
प्रीती ज्यास मिळे न धिक् खचित तो प्राणी जगीं जन्मुन
प्रीती चालवते जगत् सकल हें, प्रीती जगा जीवन.
प्रीती ती असते कशी जर तुम्हा जाणावयाची असें
या—हा ताजमहाल भव्य सगळा पाहावयाला कसे !
सत्प्रीतीस्तव अश्रुचा झरझरा जो पूर कीं वाहिला
घेवोनी जल त्यांतलेंच बहुधा हा स्वर्ग हो बांधला !
याला पाहुनि थक्क होउनि तुम्ही जातां पुरे मोहुनी
याला पाहुनियां नृपोत्तम परी आनंदला का मनीं ?
सम्राटाप्रति हाय, हीहि हलकी प्रेमस्मृती वाटुन
टाकी अश्रुस वाहते इकडुनी त्यांची नदी होउन !

बांधा स्वर्ग तरी कमी हृदयिंच्या होतील ना वेदना
मृत्यू हाच उपाय एक उरला त्या दिव्य संमीलना !

ता. १५–८–१९२३ ठाणें,

डॉ. ल. म. व का. कोलवाल,
ग्रंथ संग्रह

## —तींच ही जागा—

### ( गझल )

लोभला माझ्या ठिकाणीं—पौर्णिमेचा चंद्रमा
याच जागीं चित्त माझें—मी तुला प्रेमें दिलें !
याच जागीं या करानें—सारिले मी कुंतल
खोविलीं वेणीमधें—येथें गुलाबाचीं फुलें !
'काय बाई हें तरीं' तूं—लाजुनीया बोलतां
मीहि कानीं कायसेसें—हांसुनी सांगीतलें !
त्या निमित्तानें तुझ्याशीं—मी कधीं रागावतां
याच जागीं मोहने !—नाहींस का तूं प्रार्थिले !
घालुनीया हात केव्हां—एकमेकांच्या गळा
तूं नि मीं भावी सुखाचे—हार येथें गुंफिले !
हांसतां अन् बोलतां अन्—मी तुझ्याशीं खेळतां
याच जागीं बैसुनी—इंद्रासही धिःकारिलें !

आणि आतां याच जागीं—जीव माझा हा रडे
कां—तुला हें पाहिजे कां—मीच सांगाया गडे ?

ता. २२।१।२४ पुणें.

## –तुझे नांव घेऊन–

( शार्दूलविक्रीडित. )

होतें मी म्हटले नवीन तुजला तीं भूषणें आणिन,
काळी चंद्रकळा कडेंत जरिची नेसावया देइन,
वाहोनी फुलता गुलाब गहिने ! पूजा तुझी बांधिन,
प्रेमाचा मग धूप जाळुनि तुला नैवेद्य मी दाविन !
तूं तों नाजुक नार फूल जुइचें होशील जेव्हां श्रमी
वारा घालुनियां हळूहळु लया नेईन ते शीण मी !
होतें मी म्हटलें प्रसन्न तुजला कीं सर्वदा ठेविन
होतां पूर्ण कृपा तुझी मजवरी मोक्षाप्रती जाइन !
होतें तूं म्हटलें सुखांत अगदीं दोघेंहि येथें वसूं
केव्हां ओढवलेंच दुःख तरिही दोघें तयाला हसूं
दुःखाला मन मूळ मात्र असतें देवाकडे तें नसे
दोघें आपण आणुनी कृतिमधें सांगूं जगाला असे !

बाले ! बोल असेच ना परि अतां मी एकला हिंडतों
माळेचे मणि नांव घेउनि तुझें मी आजला ओढतों !

ता. ४।२।२४ पुणें.

## सुमतीस—

( शार्दूलविक्रीडित )

जाईच्या जुइच्या कळ्या खुडुनिया तूं त्या गडे ! आणशी
प्रेमानें मुखिं गीत गात बसुनी सौधावरी गुंफशी
त्या देण्यांत मला खरोखर तुझ्या जो मोद होई मना
देतां त्या दुसऱ्यास आज तुज तो आनंद होईल ना ?
ज्या गालावरती हळूच टिचकी मी एकदां मारली
ज्या गालावरचीं फुलें मधुरशीं मी एकदां हुंगिलीं
बाले ! मी मुखचंद्र चुंबुनि तुझ्या जो मोद होई मना
देतां तो दुसऱ्या करीं तुज गडे आनंद होईल ना ?
वाहोनी हृदयारविंद पुरती केली तुझी कामना
गीतें निर्मुनि आणि गावुनि तुझ्या आल्हादवीलें मना
देवी ! मीं न करावयास चुकलों केव्हांच आराधना—
त्याचें हें फल देवुनी तुज गडे, आनंद होईल ना ?

दे बाले ! भरुनी अगोदर परी पेला विषाचा मला
जा, हे नंतर घाल हात गहिने ! प्रेमा कुणाच्या गळां ! !

ता. २६।२।२४ मुंबई.

# तुझा या लागला छंद

## ( गज्ञल )

तुझा या लागला छंद–सुचे ना काम कीं धंदा
कृपेची घाल गे भीक–तुझा मी दास हा बंदा.
तुझ्या फुलल्या दुनीयेचें–मला हें लागलें वेड
सखे ! ये तार यांतोनी–जिवाची देउनी जोड.
तुझ्या रूपप्रदेशाचें–सदाचें राज्य लाभूं दे
तुझ्या बाले ! विलासांचें–मला ये सौख्य भोगूं दे.
तुझ्या नूपूरनादानें–तुझीं गाईन मी गाणीं
तुझ्याशी खेळतां गातां–जगत् टाकीन भारोनी !
जगीं या तूंच मत्कीर्ती–सुखाची तूंच मन्मूर्ती
मरावें वा जगावें मी–गडे सारे तुझ्या हातीं !
जगाची लाज सोडोनी–तुला हा वाहिला प्राण
नको आतां बघूं अंत–तुझी बाले ! तुला आण.

वसंताच्या अशा काळीं–पुरे झाली परीक्षा ती
असें उत्तीर्ण होणें वा–न होणें मी तुझ्या हातीं !

ता. ७।९।२३, मुंबई.

## तुझें वेड म्हणजे स्वर्गसोपान

### ( शार्दूलविक्रीडित )

‘रुमझुम् झुम्’ सजणे ! न वाजवि असे पायांतले पैंजण,
कर्णीं नाद भरोनि तोच बहिरे होतील सारे जन :
भाला फेंक तुझी पुरे, तुज न-जो जाईल गे मोहुनी,
ऐसा वीर न आढळेल तुजला या सप्तलोकांतुनी.
पाहोनीच कमानदार धनु हें,–हे तीक्ष्ण भाले तसे,
सेवेला सुरनाथही तुजपुढें येईल गे राजसे !
माला दोन तुझ्या गडे ! लपवुनी ओष्ठांत दे ठेवुन !
हें गालावरचें गुलाब फुलतें दावूं नको ! कारण—
घ्यावा एक म्हणोनि येतिल पहा धांवोनि सारेजण
घेतांना म्हणतील कीं बघितली नाहीं अशी माळिण !!
घे, घे, झांकुनियां त्वरा कर गडे ! हा चंद्रमा आपला
वेडा होइल तो जरा निसटता कोणी जरी पाहिला !

बाले ! दे अथवा झुगारुनि अतां ही आपली ओढणी
निःस्वार्थी तव वेड नेइल तया मोक्षाप्रती येथुनी.

ता. २६।९।२३, ठाणें.

# एक स्मृति

## ( शार्दूलविक्रीडित )

होतों खेळत अंगणांत तिथल्या जाईजुईच्या कळ्या
मी एके दिवशीं करें मम तुझ्या वेणीमधें खोवल्या,
तेव्हां तूं मजला म्हणालिस नभीं तारावळी पाहुनी–
"आकाशीं फुलतात शुभ्र सुमनें दे हीं मला आणुनी."
"देवांचीं मिळतील केंवि सुमनें ?" मी सांगतांना तुला
माझ्याशीं 'गडि फू' करोनि सखये ! त्वा त्यागियेले मला !!
केले यत्न परोपरी तुज गडे ! संतोषवाया परी
माझा प्रेमळ बोध तो उतरला नाहीं तुझ्या अंतरीं !
आला कंठ भरोनि खिन्न म्हणुनी मीं जाहलों तेधवां—
एकाकी–कुठुनी कसा नच कळे–आला करीं काजवा
आकाशांतिल शुभ्र पुष्प बघतां गे धन्यसें वाटलें
आनंदांत परस्परास म्हणुनी प्रेमें किती चुंबिलें !

होतां ती स्मृति आजला यशवती ! कां लाजतों आपण ?
येई आणि मनांत–तें परि तुला सांगू कशाला पण !

ता. १।१२।२३, गोरेगांव.

## तुझ्या एकाच शब्दानें

(शिखरिणी)

तुझ्या एका शब्दें शुकहि तुज जाईल भुलुनी
त्यजोनी स्वर्गातें अमरपति येईल भुवनीं
तुझ्या एका शब्दें सहज समरें तीं मिटतिल
तुझ्या एका शब्दें सकल ऋषि तेही चळतिल
कशाला हे गाती महति सवित्याची जन खुळे
तुझ्या एका शब्दें फुलतिल गडे सूर्यकमळें
न कां येईना ती रजनिपतिची कोर वरती
तुझ्या एका शब्दें जलनिधिस येईल भरती.
सुखाचा स्वामी तूं मजसि म्हणुनी काल म्हटलें
स्वताला मी तेव्हां खचित जगतीं धन्य गणलें
तुझ्या त्या शब्दें तूं उभविलि इथें नंदनवनें
तुझ्या त्या शब्दानें मजसि गमलें गोड जगणें

तुझ्या या शब्दानें परि फकिर मी आज बनलों ।
तुझ्या या शब्दानें जगुनि जगतीं व्यर्थ ठरलों ॥

ता. ४-३-२४. पुणें.

M12590

# मार्गप्रतीक्षा

## ( शार्दूलविक्रीडित ).

आकाशांतिल चंद्रम्या ! परत जा येऊं नको रे नको
सारीं कोमळ आणि शांत किरणें येथें प्रकाशूं नको.
पाहोनी तुजला जरी सुखभरें हा गोल आल्हादला
माझा चंद्र इथें परंतु नसतां अंधार भासे मला !
वेलींनो ! श्रम कां उगाच करतां हा नाच नाचूं नका !
वृक्षांनो ! अगदीं पुरेत तुमच्या या गोष्टि बोलूं नका !
गाणीं मंजुळ निर्झरा, मज अतां दावूं नको गावुनी
माझें चित्त इथें नसे क्षणभरी गेला सखा घेउनी.
शोभे ती भ्रमरांमुळें कमलिनी, आकाश ताऱ्यामुळें
पृथ्वीला सुरलोकसाम्यपण तें येतें कवीच्यामुळें.
प्रीतीच्या हंसण्यांत रूप खुलुनी धन्यत्व ये त्याजला
शालू मी जरि नेसलें भरजरी आनंद नाहीं मला !

आणावीं दररोज सुंदर फुलें वाळूनि जावीं परी–
केव्हां हा क्रम संपणार सखया येणार केव्हां घरीं ?

ता. २०–३–२४ पुणें.

## का—?

### ( गज्ञल )

सोंगटयाचा डाव बाले !–मी तुझ्याशीं खेळतां
होउनी दुर्लक्ष कोठें–चित्त तूझें रंगलें ?
काढतां कां गोष्ट मी–प्रेमांतल्या प्रेमांतली
भान तूझें लोपलें अन्–भाव तूझे लोभले ?
मी नको–हें सांगताहीं–मागच्या बागेंतलीं
तोडुनी पुष्पें तयाचे गुच्छ मातें कां दिले ?
"केशवाच्या नंदनाचीं" प्रेमगीतें वाचतां
सूर माझ्याशीं तुझे कां–एक तेव्हां जाहले ?
हासतां गालामधें तूं,–लावली दृष्टी जरा
लाजरीच्या वेलिला–कां तों बरें आलीं फुलें ?
भेटतां मार्गी कधीं–कां मंद होई चालणें
तूं नि मी मागें पुन्हां कां–चार वेळां पाहिलें ?

आणि खालीं घालुनी कां–मान आतां चालशी ?
बोलशी ना हांसशी ना–वागशी कां गे अशी ?

ता. २०–४-२४ पुणें.

## वर्षाचे संगमावर.

### ( शार्दूलविक्रीडित. )

गेला हा क्षण, तास हा, दिवस हा, हें वर्ष गेलें पहा.
येणारा क्षण तास वर्ष अवघें जाईल तैसें अहा !
झालीं भारतभूवरी चहुंकडे स्थित्यंतरें यापरी
झालें अंतर आमच्या लवभरी दुःखामधें का परी ?
येतां प्रश्न मनांत हा भरुनियां येई असा कंठ कां ?
एकाकीं नयनांतुनीं झरझरा येतात हे अश्रु कां ?
होते मूढ मती, विचार थकतो, हें बावरें कां मन ?
ही काळावर घाव घालिल अशी कां थांबते लेखण ?
न्याहाळोनि बघा जरा क्षणभरी ही झोपडी मोडकी
या हें मंदिर भव्य आणि निरखा आहे स्थिती सारखी !
कानीं येइल हाक एक तुमच्या " झालो पुरे बापुडे "
देवा, दीन दयाळ तूं बघ अतां या दीन दासांकडे.

सौख्याचीं असतलि काय अथवा हीं आमुच्या लक्षणें
सौख्याचें असतें खरोखर जगीं दुःखापुढें नांदणें.

ता. ९।५।२३ ठाणें.

# एक प्रसंग.

## ( शार्दूलविक्रीडित )

" झाला एक असेल बाळ तिजला दुःखापहारी गुणी
वस्त्रें त्यास नवीं करोनि मग तो हिंडेन मी घेउनी !
चेष्टा कांहिं करीन येतिल तिच्या गालीं गुलाबी छटा–
बाळाशीं तुलंण्यांत त्या खचित मी मानीन हो धन्यता.
बाल्याचे दिन आठवोनि फिरुनी दोघेंहि आम्ही हसूं
जाउं थोरपणास या विसरुनी बाल्यीं पुन्हां त्या वसूं
' माझ्या शक्तिनुसार देह अपुला स्त्रीकारणीं लाविन '
देवोनी स्मृति ही तिच्यावर जरा मी आज रागाविन "
नाना रम्य असे मनोरथ किती कल्पोनि आल्हादलों
' ताई ताइ ' करीत उत्सुक मनें वाड्यामधें पातलों.

हा, हा, हाय, परंतु पाहुनि मला टाहो तिनें फोडिला
कां–? हें सांगुच का तुम्हा रसिक हो- छे सांगवेना मला ! !
आतां पाहुनियां अनाथ फुल तें दुःखानलीं पोळलों
पोरावाणि तिला धरोनि हृदयीं मीही रडूं लागलों !

ता. १४।१।१९२४ पुणें.

# याचना व्यर्थ

## ( घनश्याम वृत्त )

सांगतसा मज जा येथोनी जाऊं परि मी कशी ?
प्राण वाहिला अपुल्या चरणीं जाइन मग मी कशी ?
मी माझी जर उरल्यें नाहीं हुकमत कोणावरी
कशी चालवूं प्राणवल्लभा ! इथुनी जाया तरी ?
किती तरू थैमान मांडिती लता त्यजाया परी
मनश्चकोरा ! सोडुनि कधिं कां जाती त्या वल्लरी ?
परिस्थितीची भीति कशाला सांगतसा मज गडे !
चंद्रकोरिच्या हौसेसाठीं सागर वरती चढे !
'आ' वासोनी उभे राहिले पर्वत मध्यंतरीं
तरी तयाचे जबडे फाडुनि जाई सरिता घरीं !
कोण कुणाचे-कोठिल आपण परंतु माझे मना
कसा चढावा रंग प्रीतिचा मोहकसा मोहना !

हाय परंतु कशास जीवा करशी ही याचना ?
अशी याचना करूनि कोठें प्रीति मिळे का कुणा ?

ता. २।९।२२ मुंबई.

# कोण धन्य सरदार?

( चंद्रकांत वृत्त ).

कुणा जिवाच्या प्रीतीसाठीं हा प्यारा बोल ?
कुणा प्रभूच्या पूजेस्तव ही जाईची वेल ?
कुणासाठिं हा विडा रंगला इतका रंग्दार ?
कुणासाठिं हा जरतारीचा शालू भरदार ?
हा इष्काचा पेला भरला कुणास रिझवाया ?
कुणा ऋषीला भुलवायाला आली ही माया ?
कुणा जिवाची फळास आली मंगल पुण्याई ?
कुणी मस्तकीं धारण केली ही गंगा माई ?
कुणासाठिं हा झाला जगतीं रतिचा अवतार ?
कोण धन्य सरदार एवढा होइल भरतार ?
कुणा दिलाच्या दिल्सफाइला विधिनें निर्मियली
नव्या नवतिची राजस बाळा ही रस रंगेली ?

सौंदर्याचें दर्शन म्हणजे आम्हाला दसरा
सौंदर्याच्या आधिदेवते ! स्वीकारीं मुजरा !

ता. ५।६।१९२२ मुंबई.

## रसिकास–

### ( साकी )

किती पांखरें इकडुनि तिकडे उडतांना मज दिसली
तुझ्याचवरती कशि रे राया ! माझी दृष्टी ठरली !
छे, ग बाई, हृदयीं माझ्या कसेंसेंचसें झाले !
नव्हते असले विचार तेव्हां एकाएकीं आले ! !
पुढें न जाई फिरे न मागें अडला माझा पाय !
कांपु लागली राजस राया माझी कोमल काय !
सुचे न कांहीं मनीं ध्यायलें कुणास ठावें कां ती ?
अशी खरोखर तुला पाहुनी माझी झाली स्थिती ! !
क्षणांत खालीं क्षणीं तुझ्यावर क्षणी भोंवती तर
मला न कळतां माझी दृष्टी करूं लागली थेर ?
विसरुनि गेलें होतें बाई मी तर माझेपण
अस्त तुझा होतांच तेथुनी जागी झाल्यें पण !

रसिका ! सांगा कोणी केला हा जादूचा खेळ
सत्य सांगतें मला ना कळे हें कोडें हा वेळ !

ता. १२।३।२३, पुणें.

# मी आज निराशा पुजतों.

( गझल )

माझें मन होतेंच पुरें हें अविकारी
गेलीस परी घालुनि तूं घाव जिव्हारीं !
होईन कसा हाय, बरा यांतुनि आतां
रात्रीसह जाती दिन हे याच विचारीं !
गालांत जरा हांसुनि आडून पहाणें
ठाऊक मला काय कि तें होय विषारी !
गालीं फुलती रम्य फुलें लाल गुलाबी
देशील मला दोन तरी गुंगविणारीं
होतें मजसी वादुनिया राहियलें हें
केलीस निराशाच परी दुःखविणारी !
आतां मज भासे जगिं सर्वत्र निराशा !
ती तूंच निराशा हृदयीं पेटविणारी ! !

दुःखातुनि येतें सुख जाणोनि परी हें
मी आज निराशा पुजतो मोहविणारी !

-ता. १५।१०।१९२४. पुणें.

## हा घे खांजिर–

### ( शार्दूलविक्रीडित ).

प्रेमाचा हृदयांत उद्भव कधीं झाला जरी एकादां
तें जाणार न वाळुनी; न तुटतें तोडावया पाहतां;
आनंदातिल अश्रुनीं मधुरशीं येतात त्याला फुलें
दुःखाश्रू जल घातलें तर कडू येतात त्याचीं फळें–
याचा येइल दाखला मज नसे स्वप्नांतही वाटले
बाले ! तूंच अखेर तूंच परि तें मत्प्रत्यया आणलें
तेव्हांपासुनि मात्र नांवहि तुझें सोडावयाचें असें
बाले ! मी म्हटले परंतु उलटे माझेंच होतें हसें !
जावें विस्मरुनी तुला म्हणुनिया मी यत्न केले जरी
माझ्या सुंदर आणि गोड लतिके ! माया दुणावे परी !
केला निश्चय मी नये चढुं जरी आतां तुझी पायरी
माझे पाय गडे, मला न कळतां नेती तुझ्या मंदिरीं.

हा घे खांजिर खोल हें हृदय अन् यातील मूर्ती तुझी
प्रेमें स्थापियलीस तूं तर गडे, काढोनि घे घे कशी ! !

ता. २८।४।२४ पुणें.

कव्हर ' विजय प्रेस, ५७० शनवार, पुणें ' येथें छापिलें.